समृध्दी महामार्गाकरिता १५ महामार्ग पोलीस मदत केंद्र व ०१ नियंत्रण कक्षाकरिता आवश्यक मनुष्यबळ व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एपीओ-०५२२/प्र.क्र.४७/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ :-

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/समृध्दी महामार्ग/मनुष्यबळ निर्मिती/८/२०२२, दि.२८.०६.२०२४.
२. उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १९.१०.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे दि.२३.१०.२०२६ रोजीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना :-

अपर पोलीस महासंचालक (नि. व. स), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील पत्राद्वारे समृध्दी महामार्गाकरिता १५ महामार्ग पोलीस मदत केंद्र व ०१ नियंत्रण कक्षाकरिता आवश्यक मनुष्यबळ व त्याकरिता येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला होता.

२. त्यानुषंगाने उक्त संदर्भ क्र.२ येथील दि.१९.१०.२०२६ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेली मान्यता विचारात घेऊन, शासनाने याप्रकरणी पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

समृध्दी महामार्गाकरिता १५ महामार्ग पोलीस मदत केंद्र व ०१ नियंत्रण कक्षाकरिता या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध संवर्गातील एकूण ४२० नियमित पदे, निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर ४२० पदांचे वाटप या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-ब"** प्रमाणे विविध पोलीस घटक कार्यालयांच्या आस्थापनेवर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. उक्त नमूद पदांकरीता येणाऱ्या रु.४३,४७,३३,४२४/- (रु.त्रेचाळीस कोटी सत्तेचाळीस लाख तेहतीस हजार चारशे चोवीस फक्त) इतक्या आवर्ती व रु.७,४५,८८,९६६/- (रु.सात कोटी पंचेचाळीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार नऊशे सहासष्ट फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदरील ४२० नियमित पदांची भरती झाल्यानंतर सध्या कार्यरत असलेले १९२ MSF चे कर्मचारी संबंधित यंत्रणेला परत करण्यात यावेत.

५. रिक्त पदांच्या भरतीबाबत आणि MSRDC कडून खर्चाची प्रतिपूर्ती मिळवण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

६. सदर हा शासन निर्णय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९.१०.२०२६ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व वित्त विभागाच्या अनौ. सं. क्र.२३५/आ.पु.क., दिनांक २१.१०.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०३१२५६२०५६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NAGNATH
RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by NAGNATH RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=13C3ACFAE7FC8126CE285621D58425C075E0F60C5F67596D7F7181EA8CC9011E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43D41039958F4FA2CBAEB247FAE932CC6267D47DE282ACE9AEFCEA0F0CAC955E, cn=NAGNATH RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.11.03 12:57:07 +05'30'

(नागनाथ रा. जाधव)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
११.उप सचिव (पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
१२.वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१३.निवड नस्ती, पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एपीओ-०५२२/प्र.क्र.४७/पोल-३

दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२६ चे सहपत्र.

"परिशिष्ट-अ"

समृध्दी महामार्गाकरिता १५ महामार्ग पोलीस मदत केंद्राकरिता व नियंत्रण कक्षाकरिता आवश्यक पदांचा तपशील

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
१.	सहायक पोलीस निरीक्षक	एस-१५ (४१८००-१३२३००)	१६
२.	पोलीस उप निरीक्षक	एस-१४ (३८६००-१२२८००)	३२
३.	सहायक पोलीस उप निरीक्षक	एस-१० (२९२००-९२३००)	४८
४.	पोलीस शिपाई	एस-७ (२१७००-६९१००) + रु.७५०/- विशेष वेतन	२७६
५.	पोलीस शिपाई (चालक)	एस-७ (२१७००-६९१००) + रु.७५०/- विशेष वेतन	४८
एकूण			**४२०**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एपीओ-०५२२/प्र.क्र.४७/पोल-३

दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२६ चे सहपत्र.

"परिशिष्ट-ब"

समृध्दी महामार्गाकरिता १५ महामार्ग पोलीस मदत केंद्राकरिता व नियंत्रण कक्षाकरिता निर्माण करण्यात आलेल्या ४२० पदांचे वाटप

अ.क्र.	प्रस्तवित पोलीस मदत केंद्र	जिल्हा आस्थापना	API	PSI	ASI	PC	PC वाहन चालक	एकूण
१.	वायफळ	पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रा)	१	२	३	१८	३	२७
२.	येळाकेळी (वर्धा)	पोलीस अधीक्षक, वर्धा	१	२	३	१८	३	२७
३.	धामणगाव, असेगाव (धामणगाव रेल्वे)	पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रा)	१	२	३	१८	३	२७
४.	गावनेर तळेगाव-शिवणी	पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रा)	१	२	३	१८	३	२७
५.	कारंजा लाड	पोलीस अधीक्षक, वाशिम	१	२	३	१८	३	२७
६.	मालेगाव जहांगीर	पोलीस अधीक्षक, वाशिम	१	२	३	१८	३	२७
७.	दुसरबीड	पोलीस अधीक्षक, बुलढाणा	१	२	३	१८	३	२७
८.	सिंदखेड राजा	पोलीस अधीक्षक, बुलढाणा	१	२	३	१८	३	२७
९.	निढोणा (जालना)	पोलीस अधीक्षक, जालना	१	२	३	१८	३	२७
१०.	सावंगी (छ. संभाजीनगर)	पोलीस अधीक्षक, संभाजीनगर	१	२	३	१८	३	२७
११.	हडस-पिंपळगाव (लासूर)	पोलीस अधीक्षक, छ.संभाजीनगर	१	२	३	१८	३	२७
१२.	कोकमठाण (शिर्डी)	पोलीस अधीक्षक, अहमदनगर	१	२	३	१८	३	२७
१३.	गोंदे, सिन्नर	पोलीस अधीक्षक, नाशिक (ग्रा)	१	२	३	१८	३	२७
१४.	पिंपरी सद्रोद्दीन (इगतपुरी)	पोलीस अधीक्षक, नाशिक (ग्रा)	१	२	३	१८	३	२७
१५.	शहापूर-खुटघर	पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रा)	१	२	३	१८	३	२७
१६.	समृध्दी महामार्ग नियंत्रण कक्ष, महामार्ग पोलीस (छ. संभाजीनगर)	पोलीस अधीक्षक, छ.संभाजीनगर	१	२	३	६	३	१५
	एकूण		१६	३२	४८	२७६	४८	४२०